
# INDIA@75



## आजादी का अमृत महोत्सव

Impact Factor -7.675(SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Referred Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

DECEMBER - 2021, ISSUE No.- (CCLXXXIII) 331

# 'RETROSPECTING 75 YEARS OF INDIA'S INDEPENDENCE'

Jointly Published By

**Shri Saibaba Lok Prabodhan Arts College, Wadner**

Tah. Hinganghat, Dist. Wardha (Maharashtra) 442307. &

**Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati**

Chief Editor
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati

Editor
**Dr. Naresh A. Bhoyar**
Director of Phy. Edu.
Shri Saibaba Lok Prabodhan Arts College, Wadner. Dist. Wardha

Executive Editor
**Dr. Uttam B. Parekar**
Principal
Shri Saibaba Lok Prabodhan Arts College, Wadner. Dist. Wardha

For Details Visit : www.aadharsocial.com

Aadhar Publication

Scanned with ACE Scanner

| | | |
|---|---|---|
| 47. | शेतकरी कुटुंबातील युवक व इतर युवक यांच्या निसर्गदत्त आत्मसंरक्षक प्रतिक्रियांचा अभ्यास<br>दिनेश म. ढेंगळे | 204 |
| 48. | स्वातंत्र्योत्तर काळातील महिला सबलीकरण समस्या आणि उपाय<br>प्रा. डॉ. साधना डी. वाघाडे | 208 |
| 49. | समाजसुधारकांचे महिला सक्षमीकरणातील योगदान<br>प्रा. डॉ. रवींद्र मधुकरराव बेले | 213 |
| 50. | आधुनिक ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाचा वापर व वाचकाची भुमिका:एक अभ्यास<br>डॉ. संगिता शाह, डॉ. बालाजी द. दामावले | 216 |
| 51. | महात्मा फुलेंचे लोकशाही बाबत विचार<br>प्रा. ई. आर. मुरकुटे | 221 |
| 52. | स्वातंत्र्यापूर्व भारतीय कामगार चळवळीतील डॉ. आंबेडकरांचे योगदान<br>प्रा. संदिप भा. रायबोले | 224 |
| 53. | स्वातंत्र्योत्तर भारतातील आदिवासी चळवळ<br>प्रमोद चं. वानखेडे | 227 |
| 54. | स्वातंत्र्योत्तर आंबेडकरी चळवळ: दशा आणि दिशा प्रा. डॉ. जी. पी. फसले | 230 |
| 55. | स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय विचारवंत योगी अरविंद याचे शैक्षणिक विचार<br>डॉ. सौ. लक्ष्मी विष्णू भंडारे | 236 |
| 56. | शारीरिक शिक्षणाची वाटचाल व स्वातंत्र्योत्तर काळातील बदलते दृष्टिकोन<br>डॉ. नरेश भोयर | 239 |
| 57. | स्वातंत्र्योत्तर भारतातील संसदीय लोकशाही आणि राजकीय पक्षाचे राजकारण<br>डॉ. प्रमोद मा. आचेगावे | 242 |
| 58. | स्वातंत्र्योत्तर भारतातील घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेशांची झालेली निर्मिती: एक अभ्यास<br>प्रा. श्रेयश गुरूदास मोहिते | 244 |
| 59. | समकालीन भारतीय राजकीय विचारवंत आणि लोकशाहीची संकल्पना<br>डॉ. कीर्तीकर वाल्मीक भीमराव | 251 |
| 60. | संयुक्त महाराष्ट्र चळवळीत एस.एम.जोशी, श्रीपाद अमृत डांगे व ना.ह.गोरे यांचे योगदान<br>प्रा. डॉ. किशोर बी. वासनिक | 255 |
| 61. | मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना<br>प्रा. डॉ. रुपराव उकंठराव गायकवाड | 258 |
| 62. | जल प्रदुषण : कारणे आणि उपाययोजना प्रा. डॉ. गणेश नथ्थुजी बहादे | 262 |
| 63. | स्वातंत्र्योत्तर काळातील १९६४–६५ चा भुमीहिंनाचा लढा : एक महत्वाचे पर्व<br>प्रा. डॉ. पंकज वा. मुन | 265 |
| 64. | मराठा समाजातील महिलांची सामाजिक, सांस्कृतीक, शैक्षणिक स्थिती<br>डॉ. विजय आर. भांगे | 269 |
| 65. | नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान : एक ऐतिहासिक सिंहावलोकन<br>प्रा. डॉ. तिर्थनंद बन्नगरे | 272 |
| 66. | अन्न सुरक्षा आणि मानवी हक्क प्रा.डॉ. नितीन दादाराव गौरखेडे | 274 |
| 67 | Amitav Ghosh as an Indo-Anglian Writer: Contribution to the Society<br>**Dr Tushar Vishweshwarrao Watkar** | 278 |




Scanned with ACE Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 331(CCCXXXI)
ISSN : 2278-9308
December, 2021

# स्वातंत्र्योत्तर भारतातील संसदीय लोकशाही आणि राजकीय पक्षाचे राजकारण

डॉ. प्रमोद मा. आचेगावे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स,कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज,वर्धा

लोकशाही ही अशी व्यवस्था आहे, ज्यात लोक आपले राजकर्ते निवडतात. परंतू लोकशाहीमध्ये एकाच प्रकारची शासनव्यवस्था नसते. यातील दोन प्रमुख प्रकार म्हणजे संसदीय पद्धती व अध्यक्षीय पद्धती. भारतात संसदीय शासन पद्धती आहे. संसदीय पद्धतीत दोन कार्यकारी प्रमुख असतात. एक नामधारी प्रमुख व एक वास्तव प्रमुख असतो. भारतात नामधारी राष्ट्रपती आहेत तर वास्तविक पंतप्रधान आहेत. देशांचा राज्यकारभार राष्ट्रपतीच्या नावाने — आदेशाने चालतो. तर प्रत्यक्षात निर्णय देशाचे पंतप्रधान घेत असतात. संसदीय शासन पद्धतीचे ही दोन प्रकार आहेत. एक संविधानिक राजेशाही तर दुसरा प्रजासत्ताक आहे. भारताने प्रजासत्ताक पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. संसदेमध्ये बहुमत असलेल्या व्यक्तीला पंतप्रधान म्हणून नेमणुक करतात. पंतप्रधानाची नेमणुक राष्ट्रपती करतात. संसदेमध्ये बहुमत असेपर्यंत पंतप्रधान व मंत्रिमंडळ सत्तेत असतात. भारतात संसदीय पद्धतीनुसार संसदेचे दोन सभागृह आहेत. एका सभागृहाला लोकसभा तर दुसऱ्या सभागृहाला राज्यसभा म्हटले जाते.

बहुतेक लोक प्रतिनिधिक लोकशाहीशी परिचित असतात. या प्रक्रियेमध्ये मतदारांची निवड करणे आणि राजकीय उमेदवार आणि राजकीय पक्षांना मतदान करणे समाविष्ट आहे. नागरिकांनी आपल्या निवडलेल्या नेत्यांना त्यांच्या प्रतिनिधित्व करण्याच्या इच्छेनुसार कार्य करण्याची सोय दिली. लोकशाहीत राजकीय पक्ष निवडणुकीच्या माध्यमातून सत्ता हस्तगत करतात. विविध पक्षाचे सदस्य त्यांच्या पक्षाचे उमेदवार म्हणून निवडणुक लढवतात. निवडणुकीच्या काळात राजकीय पक्ष त्यांच्या विचारसरणीनुसार विविध कार्यक्रम मतदारांसमोर मांडतात. आणि सत्तेवर आल्यास ते कार्यक्रम राबण्याचे वचन देतात. ज्या पक्षाचे कार्यक्रम मतदारांना योग्य वाटतात. त्यांना निवडुन देतात.

भारत १५ ऑगस्ट १९४७ साली स्वातंत्र्य झाले. त्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी भारताचे संविधान अंमलात आले आहे. भारताने संसदीय शासन पद्धती स्वीकारली आहे. त्यात देशाचे कार्यकारी प्रमुखापैकी जे वास्तविक प्रमुख असतात ते जनतेमार्फत निवडुन येतात. भारतातील जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकसभेत ज्या राजकीय पक्षाला बहुत आहे. त्या पक्षाची पंतप्रधानपदी नेमणूक राष्ट्रपती करतात. लोकसभेत बहूमत असेल तर पंतप्रधान आपल्या पदावर असतात. त्यामुळे बहुमताला विशेष महत्त्व आहे. ते बहूमत प्राप्त करण्यासाठी किंवा सत्ता स्वीकरण्यासाठी राजकीय पक्ष राजकारण करतात. सत्य व असत्य मार्गाने सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करतात.

- **राजकीय पक्ष व जातीय राजकारण :**

राष्ट्रीय राजकारण पूर्णपणे एका विशिष्ट जातीगटाच्या नियंत्रणाखाली राबविले जात आहे. भारताच्या अनेक घटक राज्यात जातीचे राजकारण आहे. आंध्रप्रदेशातील रेड्डी, कमार, केरळमध्ये नायर व इझावार, महाराष्ट्रात मराठा व कुणबी, गुजरातमध्ये पटेल व पाटीदार, पंजाब, हरियाणा, राजस्थान व उत्तरप्रदेशाच्या काही भागात जाट, राजपूत, अहिर व गुजर या जातीचे शेतजमिनीची मालकी, राजकीय सत्ता आणि शिक्षणाची परंपरा या कारणामुळे ग्रामिण भागात त्याचे वर्चस्व टिकून आहे. भारतातील संविधानाची अंमलबजावणी झाल्यानंतर सार्वजनिक प्रौढ मताधिकारामुळे संख्येंचे राजकारण सुरू झाले. वरिष्ठ जातीनी आपली राजकीय मक्तेदारी टिकवून ठेवण्यात यश मिळविले नंतर मध्यम जाती देशाच्या राजकारणात आपला प्रभाव पाडू लागले. कॉग्रेस, जनता पक्ष, जनता दल, लोकदल अशा पक्षांच्या माध्यमातून मध्यम जातीची संघटनात्मक प्रतिक्रिया निर्माण झाली. या पक्षाच्या नेत्यांनी जात या संकल्पनेच्या आधारावरच आपले राजकारण चालविण्याचा प्रयत्न केला. चरणसिंग, देशराज, रामकृष्ण हेगडे, कृपासिंग ठाकूर, देवीलाल, मुलायमसिंग यादव, नितिशकुमार, लालूप्रसाद यादव, इ. नेत्यांनी जातीय आधारावर राजकारण केले.

मुलायमसिंग यांचा समाजवादी पक्ष उत्तरप्रदेशात यादव व मुस्लिम यांच्यासाठी, कांशीराम व मायावती यांचा बहुजन समाज पार्टी हा पक्ष दलितांसाठी, लालूप्रसाद यादव यांचा राष्ट्रीय जनता दल



Scanned with ACE Scanner

हा पक्ष यादव, दलित अणि मुस्लिमांसाठी, कर्नाटकातील जनता दल लिगांयत समाजाकरिता सत्ता राबविण्याचा प्रयत्न करतांना दिसून येते.

• राजकीय पक्ष व धार्मिक राजकारण :

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासून हिंदूमुस्लिम वाद चालू आहे. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर कॉंग्रेस पक्षाला मुस्लिम समजाने पाठिंबा दिला होता. केरळात कॉंग्रेसने मुस्लिम लीगशी युती केली होती. भारतीय जनता पक्षाने १९८९ मध्ये रामजन्मभूमी प्रकरणाचा वापर केला. आणि लोकसभेच्या ८८ जागा जनता दलांशी आघाडी करून मिळविल्या. भाजपाचे अध्यक्ष लालकृष्ण आडवाणींच्या नेतृत्वाखालील २५ संप्टेंबर १९९० ते ३० ऑक्टोबर १९९० अशी ३६ दिवसांची रथयात्रा काढली. केंद्रात कॉंग्रेसचे सरकार असतांना ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद जमीन दोस्त करण्यात आली. भारतीय जनता पक्षाने अयोध्येत राममंदिर उभारण्यासाठी राजकारण केले. सध्या अयोध्येत राममंदिर उभारण्याचे कामकाज चालू आहे. ते न्यायालयाच्या निर्णयानंतर सुरू झाले. भारतीय राजकारणात अल्पसंख्याक व बहुसंख्याक वाद नेहमीच राहीलेला आहे. कॉंग्रेस पक्ष असो, भारतीय जनता पक्ष असो, किंवा प्रादेशिक पक्ष असो या सर्वांनी धार्मिक राजकारण केले आहे. या सर्व पक्षांना केंद्रांत व राज्यात सत्ता मिळविणे हे उद्दिष्ट असते.

भारतातील सर्वच राजकीय पक्ष लोकांच्या धार्मिक भावना चेतावितात. आणि त्यांची मते मिळवून निवडून येतात. भारतात धार्मिक राजकारणामुळे नेहमीच हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत. उदा. गुजरात मधील गोध्रा कांड, बाबरी मशीद पाडल्यानंतर १९९२–९३ मध्ये भारतात अनेक भागात हिसांचारांच्या घटना झाल्या आहेत.

• राजकीय पक्ष व भाषिक राजकारण :

भारतात भाषेच्या आधारावर प्रांतरचना झाली आहे. शैक्षणिक धोरणातही त्रिभाषिक सुत्र स्वीकरण्यात आले आहे. त्रिभाषिक सुत्रानूसार राष्ट्रभाषा हिंदी आहे. तसेच प्रत्येक प्रांताची भाषा वेगळी आहे. त्यामुळे प्रादेशिक पक्षा भाषिक राजकारण करतात. महाराष्ट्रात राहायचे असेल तर मराठी भाषा बोलली पाहिजे असे मनसे, शिवसेना पक्ष म्हणतो. तसेच त्या भाषेचे राजकारण हिंदी भाषेला विरोध करतात. तामिळ तामिळी भाषेचा पुरस्कार करतात.

• प्रादेशिक पक्षाचा उदय आणि आघाड्यांचे राजकारण

भारतीय राजकारणात १९६७ पर्यंत कॉंग्रेस पक्षाचे प्राबल्य होते. केंद्रात व घटक राज्यात या पक्षाचे सरकार होते. परंतू १९६७ नंतर अनेक घटक राज्यात प्रादेशिक पक्षाचा उदय झाला. आंध्रप्रदेशात तेलगू देशम, तामिळ राज्यात द्रविड, अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम, पंजाबमध्ये शिरोमणी, अकाली दल इ. पक्षाचा उदय झाला. त्या घटक राज्यात त्या पक्षाचे वर्चस्व निर्माण होऊ लागले. ते आपल्या घटक राज्याचा विचार करू लागले. ते केंद्र सरकार दबाव आणू लागतो. केंद्रात देखील कोणत्याही एका पक्षाला लोकसभेत बहुमत मिळत नव्हते. त्यामुळे केंद्र पातळीवर आघाड्यांचे राजकारण सुरू झाले. त्यातून भाषिक, जातीय, धार्मिक मुद्दे राजकारणात केंद्रबिंदतू राहू लागले आहेत.

भारत हे संविधानातील उद्देशपत्रिकेनुसार धर्मनिरपेक्ष राज्य आहे. पण राजकीय पक्षाच्या धर्मवादी राजकारणामुळे भारतात हिंसाचाराच्या घटना घडत असतांना दिसून येतात. बहुमताची कांडी आपल्या हाती यावी. यासाठी कॉंग्रेस पक्ष असो, भाजप असो किंवा प्रत्येक राज्यातील प्रादेशिक पक्ष असो धार्मिक, भाषिक, जातीच प्रादेशिक राजकारण करतांना दिसून येतात. असे असले तरी लोकशाही शासन व्यवस्थेत राजकीय पक्षाचे महत्त्व नाकारता येत नाही. संसदीय शासनात बहुमताला महत्त्व असते. त्यामुळे बहुमताने निर्णय घ्यावे लागतात. संसदीय शासन व राजकीय पक्षाच्या राजकारणांमुळे काही सकारात्मक घटनाही घडल्या आहेत. राजकीय पक्षाच्या जातीच्या राजकारणामुळे नितिशकुमार, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, मायावती, देवलाल या सारखे राज्यकर्ते निर्माण झाले. एवढेच नव्हे तर अल्पसंख्यात्मक समाजातील नेतृत्वाचाही उदय झालेला दिसून येतो.

• संदर्भ ग्रंथ :

1. डॉ. अल्का देशमुख — भारताचे शासन व राजकारण , श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपूर
2. प्रा. शेख हासम, डॉ. जोगेंद्र गवई — भारताचे शासन व राजकारण, विश्व पब्लिशर्स ॲन्ड डिस्टिब्युटर्स
3. भा. ल. भोळे — भारतीय शासन व राजकारण



Scanned with ACE Scanner

Impact Factor-8.575 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2022

ISSUE No- (CCCXLI) 341

## The Relevance of The Feminism Movement in the Twenty -First Century



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social Research &, Development
Training Institute, Amravati.

**Executive-Editors**
Dr. Vinod S. Sonawane
I/C Principal,
Arts, Commerce and Science College, Onde,
Tal. Vikramgad, Dist. Palghar

**Editors**
Dr. Chetana Yogesh Patil
Convener & Vice Principal, Head,
Women Development Cell
Arts, Commerce and Science College,
Onde, Tal. Vikramgad, Dist. Palghar

**Editors**
Dr. Basweshwar Pandagale
Co-Ordinator
HOD, Department of Political Science
Arts, Commerce and Science College,
Onde, Tal. Vikramgad, Dist. Palghar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with ACE Scanner

## INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | हैद्राबाद मुक्ती संग्रामातील महिलांचे योगदान प्रा.डॉ.कोंडेकर आर.एस. | 1 |
| 2 | स्त्रीवाद : लिंगगुणोत्तर प्रमाणातील विशमता व स्त्रीभ्रूण हत्या प्रा. डॉ. रोहित सुधाकर गायकवाड | 5 |
| 3 | सणगर समाजातील स्त्रीयांचे प्रश्न व स्त्रीवाद प्रा. डॉ. सुनिलदत्त एस. गवरे | 9 |
| 4 | भारतीय संविधान आणि महिला सक्षमिकरण सहा. प्रा. लक्ष्मन बाबाराव यादव | 17 |
| 5 | पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा राजकीय सहभाग एक चिकित्सक अध्ययन डॉ. सुभाष दौलतराव उपाते | 20 |
| 6 | स्त्रीवाद आणि आदिवासी महिला डॉ. अजय पेत्रस बोरकर | 26 |
| 7 | महिला सक्षमीकरण: सामाजिक, साहित्यिक चळवळीच्या संदर्भातून प्रा.संदिप चपटे | 32 |
| 8 | आधुनिक मनू आणि स्त्रीमुक्ती बील डॉ.पौळ भावन श्रीपती | 38 |
| 9 | साधना साप्ताहिकातून स्त्रीवादी चळवळीचा आढावा डॉ. वाईकर शोभा बबन | 43 |
| 10 | एकविसाव्या शतकात महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रियांची स्थिती. डॉ.संतोष हनुमंत जाधव | 46 |
| 11 | ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांचा राजकीय सहभाग प्रा. डॉ. प्रमोद मा. आचेगावे | 50 |
| 12 | ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांच्या समोरील आव्हानांचा अभ्यास **Mr. Sante Lalchandra Ramchandra** | 52 |
| 13 | बहुजनांची स्फूर्तिनायिका: सावित्रीआई फुले डॉ.शिंदे आर. डी. | 57 |
| 14 | पंचायतराज : ७३ वी घटनादुरुस्ती आणि महिला सबलीकरण डॉ. तानाजी संभाजी माने | 63 |
| 15 | भारतातील स्त्रीवादी चळवळ प्रा. डॉ. आर. डी. मांडणीकर | 68 |
| 16 | मानवी हक्क आणि महिलानांचे कायदेविषयक अधिकार प्रा. लक्ष्मण मारोती घोटेकर | 73 |
| 17 | महिलाचा राजकीय सहभाग : एक दृष्टिक्षेप प्रा.डॉ.बसवेश्वर पांडागळे | 78 |
| 18 | भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील डॉ. ॲनी बेझंट यांचे योगदान **Dr.Madhukar Vithoba Jadhav** | 82 |
| 19 | महिला सबलीकरण आणि ऐतिहासिक परीप्रेक्षातील स्त्रियांचे जीवन प्रा.डॉ. अब्दुलसमद बादशाह शेख | 85 |




Scanned with ACE Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 341 (CCCXLI)
ISSN : 2278-9308
March, 2022

# ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांचा राजकीय सहभाग

प्रा. डॉ. प्रमोद मा. आचेगावे
इंद्रप्रस्थ न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, वर्धा.

ग्रामिण अर्थव्यवस्था सुदृढ व स्वावलंबी, आत्मनिर्भर बनविण्याकरीता तसेच नागरिकांना सोयी सवलतीची पूर्तता, सत्तेचे विकेंद्रीकरण, ग्रामिण भागातील नागरिकांचा राजकारणात सहभाग वाढविण्याच्या अुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थेची व्यवस्था निर्माण करुन त्याला संवैधानिक मान्यता प्राप्त करुन देणे हे भारतीय शासन व्यवस्थेतील अत्यंत महत्वाची घटना आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद 40 अनुसार स्पष्ट केले आहे की राज्य ग्रामपंचायतोका गठन करने के लिए कदम उठाएगा और ऐसी शक्तीया और प्राधिकार प्रदान करेगा जो उन्हे स्वायत्त शासन की ईकायों के रुप में कार्य करने योग्य बनाने के लिए आवश्यक हो याच आधारावर भारतात 2 ऑक्टोंबर 1959 रोजी पंडित नेहरु यांच्या पुढाकाराने राजस्थानातील नागोर येथे पंचायतराज संस्थांची स्थापना करण्यात आली. भारतीय संविधानात 73 वी घटना दुरुस्ती करुन ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेला घटनात्मक दर्जा देण्यात आला. 1993 मधे संपुर्ण देशात त्यांची अंमलबजावणी झाली आहे. यात अनुसूचित जाती-जमाती बरोबरच महिला व ओबीसी करिता आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली.

भारतात महिलांचे विश्व हे चुल आणि मूल पुरतेच मर्यादित होते. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात त्यांचे प्रमाण अल्प होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतरही त्याच्या राजकीय स्थितीत बदल झालेले नाही. त्याचा राजकीय सहभाग राष्ट्रीय व राज्य पातळीवर अल्पप्रमाणात आहे. देशात बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनंतर त्रि-स्तरीय पंचायतराज संस्थेची स्थापना झाली आहे. ह्या संस्थेत देखील त्याचा राजकीय सहभाग नव्हता. महाराष्ट्रात जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम लागू झाले आहे. तेव्हा संपूर्ण राज्यातून दोन महिला निवडणूकीला उमेदवार म्हणून अर्ज भरला होता. परंतू त्या दोन्ही महिला निवडणूकीत निवडूण येऊ शकल्या नव्हत्या. 1973 मध्ये पश्चिम बंगाल पंचायत अधिनियम लागू झाले आहे. तेव्हा त्या राज्यातून दोनच महिला निवडणूकीत विजयी झालेल्या आहेत. 1983 मध्ये कर्नाटक शासनाने महिलांना 25 टक्के आरक्षण व्यवस्था केले. तो अधिनियम 1987 मध्ये लागू झाला आहे. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत 30 हजार महिलांनी उमेदवारी अर्ज भरले होते . त्यापैकी 14 हजार महिला निवडणूकीत विजयी झाल्या आहे. 1988 साल 22 वर्षानंतर उत्तरप्रदेशात स्थानिक संस्थेच्या यात त्यात एकच महिला विजयी झाली आहे . 1991 साली उडिसात पंचायत समित्यात 1/3 सिटे महिला करिता आरक्षित ठेवली होती . 1992 मध्ये त्या राज्यात निवडणूका झाल्या त्यात 22 हजार महिला निवडूण आल्या आहेत. त्याचे राजकीय सहभाग 35 टक्केपर्यंत गेले आहे. देशात 73 वी व 74 वी घटना या दोन्ही घटनादुरुस्ती झाल्या आहेत. या दोन्ही घटना दुरुस्ती नंतर स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना 1/3 टक्के आरक्षण मिळाले. 1994 नंतर महिलांना राजकीय सहभागात वृध्दी होण्यास प्रारंभ झाला आहे .

Scanned with ACE Scanner

तक्ता क्रमांक 1भारतातील पंचायत राज संस्थेमधील महिला नेतृत्वाची संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | वर्ष | पंचायत संस्था स्तर | महिला सदस्य संख्या | एकूण वर्ष निहाय संख्या |
|---|---|---|---|---|
| 1. | 2000 | जिल्हा परिषद | 4088 | 815177 |
| 2. | | पंचायत समिती | 38412 | |
| 3. | | ग्रामपंचायत (सरपंच) | 772677 | |
| 4. | 2004 | जिल्हा परिषद | 4923 | 890623 |
| 5. | | पंचायत समिती | 47455 | |
| 6. | एकूण ... | ग्रामपंचायत ( सरपंच ) | 838245 | 1705800 |

स्त्रोत : डॉ . हिमांशू शेखर , कुरुक्षेत्र , हिंदी मासिक , जानेवारी 2014 प्र . क्र . 21

तक्ता क्रमांक 1

| अ.क्र. | पंचायत संस्था स्तर | संख्या | एकुण सदस्य संख्या | महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1. | जिल्हा परिषद | 33 | 1955 | 978 |
| 2. | पंचायत समिती | 351 | 3910 | 1951 |
| 3. | ग्राम पंचायत | 27896 | 197338 | 98669 |
| | एकूण ... | 28280 | 203203 | 101598 |

स्त्रोत : जगदीश मोरे, लोकराज्य, मराठी मासिक, एप्रिल 2012, पू.क्र.56

उपरोक्त दोन्ही तक्त्यांतील तपशिलावरुन असे निदर्शनास येते की, 73 व्या घटनादुरुस्ती नंतर पंचायतराज संस्थेत महिलांच्या राजकीय सहभागात वृध्दी होत आहे. केरळ राज्यात सर्वात अधिक महिलांचा पंचायतराज संस्थेत सहभाग आहे. त्यांचे प्रमाण 57.24 टक्के एवढे आहे . 24 मार्च 2011 रोजी पंचायत राज संस्थेमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. या कायद्यामुळे महाराष्ट्रात महिला पंचायत राज संस्थेने सहभाग 50 टक्के पेक्षा जास्त प्रमाणात वाढविले दिसते . कल्पना हजारे यांच्या मते स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये अगोदर 33 आणि नंतर 50 टक्के आरक्षणामुळे महिला मोठ्या संख्येने राजकारणात सहभागी होत आहे ते खरंही आहे.

स्वांतत्रोत्तर काळात भारतीय राजकारणातील महिला नेत्या म्हणून इंदिरा गांधी, सोनिया गांधी, जयललिता ममता बॅनर्जी, मायावती, प्रतिभा पाटील, सुप्रिया सुळे, शिला दिक्षित, वसुंधराराजे सिंदिया, निलीमा गोरे, इत्यादी नावे सुपरिचित आहेत. दोन दशकापासून पर्यावरण, बचतगट, सामाजिक चळवळी, दारुबंदी इत्यादीच्या माध्यमातुन अनेक महिला नेतृत्व समोर येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना राजकीय आरक्षणाचे कवच प्राप्त झाल्यानंतर व राजकारणात त्यांचा प्रमाण वाढले त्यानंतर महिला आत्मविश्वासाने बोलत आहेत. काहीतरी करुन दाखवण्याची महिलांमधील जिद्द वाढली आहे. महिलाच्या राजकारणातील सहभागाविषयीच्या वाढणा-या प्रतिकुलतेला महिलांनी एक शक्ती बनवण्यात यश मिळविले.

संदर्भ ग्रंथ:-

1) संपादित,डॉ. हिमांशू शेखर, कुरुक्षेत्र, हिंदी मासिक जानेवारी 2014, पृ.क्रं.21.
2) लोकप्रभा, सामाहिक मराठी मुंबई 14 मार्च 2014, पृ.क्रं.23.
3) डॉ.व्ही.एल. फाडिया, भारतीय प्रशासन प्रतियोगीता प्रकाशन.



Scanned with ACE Scanner